**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अमरावती ग्रामीण    **P.S.(ठाणे):** परतवाडा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0360    **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/05/2025 23:11

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार    **Date From (दिनांक पासून):** 08/05/2025

**Time Period (कालावधी):** पहर 5    **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/05/2025

**Time From (वेळेपासून):** 13:40 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:53 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 08/05/2025    **Time (वेळ):** 22:56 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 055

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/05/2025 22:56 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 1 किमी    **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जय भवाणी हटेल व रेस्टरेंन्ट,अचलपुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.रंजीतसिंह प्रशांत चावरे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1996
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | संतोश नगर, परतवाडा,अचलपुर,परतवाडा,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | संतोश नगर, परतवाडा,अचलपुर,परतवाडा,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-7020836406

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. भारत गुलाब सिडाम | | | 1. शिरभाते नगर, कांडली, परतावाडा ,ताअचलपुर, परतवाडा,अमरावती ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्कम 500 रु च्या 32 | 16,000.00 |



Scanned with CamScanner

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रु.** |
|---|---|---|---|---|
| | | | नोटा अशा एकुन 16000रु | |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

16,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

अपराध क्रमांक व कलम - /2025 कलम 7 भ्रष्टाचार प्रतीबंदक अधिनीयम 1988
फिर्यादी - श्री.रंजीतसिंह प्रशांत चावरे,वय-29वर्ष, शिक्षण -BE Mechanical, व्यवसाय - ए.आर.कौशल सोलार O.P.C. प्रायव्हेट लिमीटेड GSTIN-27CJNPC2298G1ZZ कंपनीचे संचालक, रा.संतोश नगर, परतवाडा, ता.अचलपुर जि.अमरावती मो.क्र.7020836406.
आरोपी - लोकसेवक श्री. भारत गुलाब सिडाम, वय 48 वर्ष, पद सहायक अभियंता, वर्ग-2, म.रा.वि.वि.कं.मर्या. धारणी जि.अमरावती, ह.मु. श्री.दिपक सराफ किरायाने, शिरभाते नगर, कांडली, परतावाडा जि.अमरावती
घटनास्थळ - जय भवाणी हॉटेल व रेस्टॉरेंन्ट परतवाडा अचलपुर
घ ता वेळ – दि 08/05/2025 चे 13/40 वा ते 13/53 वा
मिळालेला माल – लाच रक्कम 500 रु च्या 32 नोटा अशा एकुन 16000रु

फिर्याद
दिनांक: 08/05/2025

माझे नाव:- श्री.रंजीतसिंह प्रशांत चावरे,वय-29वर्ष, शिक्षण -BE Mechanical, व्यवसाय - ए.आर.कौशल सोलार O.P.C. प्रायव्हेट लिमीटेड GSTIN-27CJNPC2298G1ZZ कंपनीचे संचालक, रा.संतोश नगर, परतवाडा, ता.अचलपुर जि.अमरावती मो.क्र.7020836406.

मी दि.07/05/2025 रोजी समक्ष अॅन्टी करप्शन कार्यालय, अमरावती, येथे हजर राहून लेखी तक्रार दिली होती की, मी वरील पत्यावर आई वडीलासह राहतो. माझे स्वतःचे नावावर ए.आर.कौशल सोलार O.P.C. प्रायव्हेट लिमीटेड नावाने कंपनी नोंदणीकृत आहे. या कंपनीच्या माध्यमातुन मी घरोघरी सोलर बसवण्याचे काम घेत असतो. माहे एप्रील 2025 मध्ये मी धारणी येथे चार वेगवेगळया लोकांचे घरी सोलार पॅनल बसवायचा ठेका घेतला होता. त्यासंबधाने माझे धारणी येथील चार ग्राहक यांचेसोबत दिनांक 27/03/2025 रोजी करार झालेला आहे. सदरचे काम हे मी नियमानुसार पुर्ण करुन मी दि.07/04/2025 रोजी म.रा.वि.वि.कं.कार्यालय, धारणी येथे मिटर रिलीज करण्याकरिता, मिटर रिलीज ऑर्डर काढण्याकरीता आणि Inspection Approve करण्याकरीता अर्ज ग्राहकाच्या वतीने केला आहे.
नमुद अर्जाच्या अनुशंगाने दि.25/04/2025 रोजी श्री.भारत सिडाम, सहायक अभियंता,म.रा.वि.वि.कं.कार्यालय, धारणी यांचे मोबाईल क्र.9423416801वरुन मला माझे मोबाईल क्र.7020836406 वर कॉल आला आणि त्यांनी मला म्हटले की ''तुमच्या ग्राहकाचे अर्ज माझे कार्यालयात प्राप्त झाले आहे. तुम्ही नमुद ग्राहकाच्या केलेल्या कामाची पाहणी करुन तुमचे काम करुन देतो. त्यासाठी 'काय आहे ते पैशाचे पाहून घे, मी परतवाडयातच आहे असे म्हटले. त्यावेळी मी त्यांना 'ठीक आहे, असे म्हटले. परंतु सध्या मी बाहेरगावी आहे नंतर तुम्हाला भेटतो' असे बोलून फोन ठेवून दिला.
त्यानतर माझी श्री.भारत सिडाम, सहायक अभियंता,म.रा.वि.वि.कं.कार्यालय,धारणी यांचेसोबत परतवाडा येथे भेट झाली. तेव्हा त्यांनी मला म्हटले की, तुझे काम करायचे असेल तर एका फाईलचे 5000/- रुपये दयावे लागतील.



Scanned with CamScanner

परंतु, मला श्री.भारत सिडाम, सहायक अभियंता,म.रा.वि.वि.कं.कार्यालय,धारणी यांना माझे कामाच्या चार फाईल करीता प्रत्येक फाईलचे 5000 रु. प्रमाणे एकुण 20,000/-रू. लाच रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांचेवर कायदेशीर कारवाई करीता मी लेखी तक्रार दिली होती.
श्री.भारत सिडाम, सहायक अभियंता,म.रा.वि.वि.कं.कार्यालय,धारणी यांचे सोबत माझा कोणताही आर्थिक व्यवहार नाही. तसेच त्यांच्याशी माझे कोणत्याही प्रकारचे वैमनस्य नाही. तरी श्री.भारत सिडाम, सहायक अभियंता,म.रा.वि.वि.कं.कार्यालय,धारणी यांचेवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही व्हावी, ही विनंती अशा आशयाची तक्रार मी दिली होती.

मी दिलेल्या तक्रारीवर कारवाई करण्याकरीता पोउपअधि.श्री.अभय आष्टेकर,ला.प्र.वि.अमरावती यांनी जिल्हा उदयोग केंद्र,अमरावती या कार्यालयास पत्रव्यवहार करुन दोन सरकारी पंच त्यांचे कार्यालयात बोलावुन माझा त्यांना परिचय करुन दिला व दोन्ही पंचास व मला डिजिटल व्हाईस रेकॉर्डर बद्दल माहीती सांगुन त्याची कार्यपध्दती सांगितली व प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्या संदर्भात सविस्तर पडताळणी पुर्व पंचनाम्याची कार्यवाही करण्यात आली. तसेच पडताळणीची कार्यवाही दि.08/05/2025 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानुसार दिनांक 08/05/2025 रोजी पोलीस उपअधिक्षक श्री.आष्टेकर, दोन शासकीय पंच आणि सापळा पथक हे सर्व लोक 10.45 वा. सुमारास परतवाडा अमरावती रोडवरील राजवाडा हॉटेल समोर आले व त्याठिकाणी त्यांची व माझी भेट झाली. त्यानंतर मी माझे मोबाईलवरुन लोकसेवक श्री.सिडाम यांच्या मोबाईल क्रमांकावर कॉल केला असता त्यांनी मला सांगीतले की, मी अर्धातासात तुम्हाला तुमच्या ऑफीसकडे भेटतो त्यानंतर मी दोन्ही शासकीय पंच व सापळा पथकातील अधिकारी, कर्मचारी वाघामाय मंदीर चौक येथे गेलो. त्या ठिकाणाहून मी परत लोकसेवक श्री.सिडाम यांना कॉल केला व वाघामाय मंदीर चौकात बोलावले. त्याठिकाणी मला सापळा पथकातील कर्मचारी श्री.आशिष जांभोळे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे गळयात लटकवून दिले. त्यानंतर काहीवेळाने लोकसेवक श्री.सिडाम हे त्यांचे चारचाकी वाहनाने वाघामाय मंदीर चौकात आले. लोकसेवक हे स्वतः ते वाहन चालवत होते.

त्यानंतर मी व पंच क्र. 1 श्री.अमोल खडसे असे आम्ही दोघेजण लोकसेवक श्री.सिडाम यांचे चारचाकी वाहनामध्ये बसलो. मी लोकसेवक यांच्या बाजुच्या समोरच्या सिटवर बसलो आणि पंच क्र.1 श्री.खडसे मागील सिटवर बसले. त्यानंतर माझे व लोकसेवक श्री.सिडाम यांचे माझे कामाच्या अनुशंगाने बोलणे झाले आणि त्यांनी मला म्हटले की, 'प्रत्येक फाईलचे एक हजार रुपये कमी दया, त्यावर मी त्यांना म्हटले की, म्हणजे एक फाईलचे चार हजार रुपये' त्यावर त्यांनी हो म्हटले. त्यानंतर त्यांनी मला व पंच क्र.1 श्री.खडसे यांना माझे अचलपुर रोडवरील जोशी मार्केटजवळील माझे दुकानाजवळ सोडले. त्यावेळी मी त्यांना विस मिनीटात आणून देतो, तुम्हाला फोन करतो असे म्हटले. त्यानंतर लोकसेवक श्री.सिडाम हे तेथून निघून गेले व मी माझे ऑफीसमधील दुचाकी गाडीने वाघामाय मंदीर चौकामध्ये पंच क्र.1 यांचेसह परत आलो त्यावेळी पो.कॉ.आशिष जांभोळे यांनी माझे गळयातील रेकॉर्डर काढून बंद केला व मला आणि पंच क्र.1 यांना काय हकीकत घडली याबाबत विचारले असता मी व पंच क्र.1 यांनी त्यांना घडल्याप्रमाणे हकीकत सांगीतली. त्यानंतर व्हाईसरेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले माझे व लोकसेवक श्री. सिडाम यांचे संभाषण दोन्ही पंच आणि सापळा पथकातील अधिकारी कर्मचारी यांनी ऐकले आणि सर्वांची खात्री झाली की, लोकसेवक श्री.सिडाम यांनी मला 16,000/- रु. लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.
त्यावरून लागलीच सर्वानुमते लोकसेवक श्री.सिडाम यांचेवर सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे ठरवण्यात आले. त्याकरीता पोउपअधि श्री.आष्टेकर यांनी मला लोकसेवक श्री.सिडाम यांना देण्यासाठी लाच रक्कम 16,000/- रू. हजर करण्यासाठी सांगितलेवरून मी माझेजवळील 16,000/- रू. त्यात 500/- रू. दराच्या एकुण 32 नोटा हजर केल्या. त्यानंतर पोउपअधि श्री.आष्टेकर यांनी त्या नोटांचे क्रमांक आणि नोटांना अॅन्थ्रॉसीन पावडर लावण्याचा सविस्तर सापळापुर्व पंचनामाची कारवाई केली.
त्यानंतर मी लोकसेवक श्री.सिडाम यांना माझे मोबाईल वरुन कॉल केला आणि लाचेची रक्कम घेवून कुठे येवू असे विचारले असता त्यांनी मला अमरावती रोडवरील 'जय भवानी हॉटेल व रेस्ट्रॉरेंट, परतवाडा' येथे बोलावले. त्यानंतर मला सापळा पथकातील कर्मचारी श्री.आशिष जांभोळे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे गळयात लटकवून दिले. त्यानंतर मी व पंच क्र. 1 श्री.खडसे असे आम्ही दोघे माझे दुचाकी वाहनाने लोकसेवक श्री.सिडाम यांना भेटण्याकरीता 'जय भवानी हॉटेल व रेस्टॉरेंट येथे रवाना झालो. माझे मागे पंच क्र.2 व संपुर्ण सापळा पथक त्यांचे शासकीय वाहनाने येत होते. त्यांनतर जय भवानी हॉटेल व रेस्टॉरेंट जवळ पोहचून मी माझे वाहन उभे केले. मी व पंच क्र.1 श्री.खडसे असे जय भवानी हॉटले मध्ये गेलो असता आत मध्ये मला लोकसेवक श्री.सिडाम एका खुर्चीवर बसलेले दिसले. मी व पंच क्र.1 श्री.खडसे त्यांच्या बाजुच्या खुर्चीवर जावून बसलो. आमचेमागे सापळा पथकातील



Scanned with CamScanner

अधिकारी व कर्मचारी जय भवानी हॉटेलच्या परिसरात पोहचुन आजुबाजुला आडोसा घेवून आम्ही त्यांना दिसेल असे थांबले. माझे श्री.सिडाम यांचेसोबत पंच क्र. 1 यांचे समक्ष कामाच्या आणि लाचेच्या रक्कमेबाबत बोलणे झाले आणि लोकसेवक श्री.सिडाम यांनी मागणी केल्यानंतर मी लाचेची रक्कम 16,000/- रुपये लोकसेवक श्री.सिडाम यांना दिली असता त्यांनी ते स्विकारली व मी लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत ईशारा केल्यावरुन सापळा पथकातील अधिकारी/कर्मचारी व पंच हे त्याठिकाणी आले. त्यांनी माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर बंद केला, लोकसेवक श्री.सिडाम यांना त्यांचा परीचय देवून पंच क्र.2 यांचे मदतीने लाचेची रक्कम लोकसेवक श्री.सिडाम यांचेकडून हस्तगत केली. सदरचे ठिकाण हे सार्वजनिक असल्या कारणाने पुढील कार्यवाही करीता लोकसेवक यांना शासकीय विश्रामगृह,परतवाडा येथे घेवून आले आणि झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा सविस्तर पडताळणी,सापळापुर्व व सापळा पंचनामा तयार करण्यात आला.

तरी दिनांक 08/05/2025 रोजी 13.40 ते 13.53 वा.चे दरम्यान जय भवानी हॉटेल व रेस्टॉरेंट,परतवाडा येथे लोकसेवक श्री. भारत गुलाब सिडाम, वय 48 वर्ष, पद सहायक अभियंता, वर्ग-2, म.रा.वि.वि.कं.मर्या.धारणी जि. अमरावती, ह.मु. श्री.दिपक सराफ किरायाने, शिरभाते नगर, कांडली, परतावाडा जि.अमरावती यांनी मला माझे ग्राहकांचे सोलर पॅनलचे मिटर रिलीज करण्याकरीता, मिटीर रिलीज ऑर्डर काढण्याकरीता तसेच इन्स्पेशन अप्रुवल करण्याकरीता लाच मागणी संबंधाने केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान मला पंचासमक्ष 16,000/-रू. लाचेची मागणी करून आयोजित सापळा कारवाई दरम्यान माझेकडुन 16,000/-रू. लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यामुळे त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, ही विनंती.

समक्ष

( अभय आष्टेकर )
पोलीस उपअधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

SURESH RAMESHWAR MASKE(I (Inspector)) / DGPSRMM8106 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**



Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

स्टेशन डायरी अंमलदार
पोलीस स्टेशन परतवाडा

**Signature of Officer-In-charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SURESH RAMESHWA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPSRMM8106



Scanned with CamScanner